http://www.sgbauonline.com/



# M.A. (Part—II) Marathi (Semester—III) Examination

## MARATHI

## (Upyojit Marathi)

## Paper—1

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :—(1) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

(2) वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे एकापेक्षा अधिक वेळा लिहिल्यास मूल्यांकनासाठी पहिले उत्तर ग्राह्य धरण्यात येईल.

1. टिपणी लेखनाची कार्यालयीन प्रक्रिया स्पष्ट करून टिपणी लेखनाचे प्रकार विशद करा.

**किंवा**

सारांश लेखनाचे महत्व स्पष्ट करून सारांशलेखनाच्या पायऱ्या उलगडून दाखवा.

2. जाहिरातींचे महत्व पटवून द्या व मुद्रित माध्यमे, नभोवाणी आणि दूरचित्रवाणी या माध्यमांच्या अनुषंगाने जाहिरात लेखनाचे स्वरूप कसे बदलते त्याचा परामर्श घ्या.

**किंवा**

अहवाल लेखनाची उपयुक्तता विशद करून तो लिहिताना कोणते मुद्दे महत्वाचे ठरतात ? चर्चा करा.

3. माहिती पत्रकाचे महत्व लिहून त्याच्या विविध प्रकारांचा आढावा घ्या.

**किंवा**

इतिवृत्त लिहिताना कोणत्या गोष्टी महत्वाच्या ठरतात त्याचा परामर्श घ्या.

4. निमंत्रण व कार्यक्रम पत्रिका तयार करताना कोणती काळजी घ्यावी हे स्पष्ट करून मुलीच्या पाचव्या वाढदिवसाच्या निमंत्रण पत्रिकेचा नमुना तयार करा.

**किंवा**

पुढील उताऱ्याचे लेखनविषयक नियमांप्रमाणे पुनर्लेखन करून तो उत्तर पत्रिकेत लिहा :

ईतर वीवीध क्षेत्रात प्रगती साधन्यासाठी शिक्षणक्षेत्रात मराठी येवस्थितपने प्रस्थापित करायला हवी भारतातील इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातिल सर्व शाळामध्ये पाचवी ते दहावीपर्यंत राजभाषा मराठीचे शिक्षण अनीवार्य असायलाचहवेयासाठी स्वत सर्वोच्च न्यालयानेदेखील राज्यशासनास कायदेशिर व नैतीक तत्वांवर पाठींबा दिलेला आहे. तो निर्नय प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांवर आपण दबाव आणायला हवा.

5. योग्य पर्याय निवडून पुढील वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे लिहा (उदा. प्रश्न क्र 1 (ब) साने गुरुजी) :

(1) जाहीर निवेदनाचा हेतू काय असतो ?

(अ) माहिति देणे

(ब) साहाय्यासाठी आवाहन करणे

(क) सार्वजनिक समस्या वा बाबींचे प्रकटीकरण करणे

(ड) वरीलपैकी सर्व



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(2) कार्यालयीन पत्रव्यवहारात दिनांक कसा लिहावा ?

(अ) 10.10.18 (ब) 10 ऑक्टोबर 2018

(क) $10\frac{10}{18}$ (ड) 10 ऑक्टो. 18

(3) स्वपरिचयपत्र लिहिताना पुढीलपैकी कोणत्या गोष्टीला महत्त्व द्यावे ?

(अ) स्वतःची बलस्थाने (ब) तो कोण वाचणार आहे

(क) आवश्यक व सुसंगत माहिती (ड) यापैकी सर्व

(4) नभोवाणी केंद्रावरून प्रसिद्ध केल्या जाणाऱ्या निवेदनाची सुरुवात कशी असावी ?

(अ) कृपया इकडे लक्ष द्या (ब) एक महत्त्वाची माहिती

(क) एक विशेष सूचना (ड) मी आपणांस सांगू इच्छितो की

(5) जाहिरातीची भाषा कशी असावी ?

(अ) संस्कृतप्रचुर (ब) लोकांशी संवाद साधणारी

(क) प्रमाण (ड) बोली

(6) अहवाल लेखन करताना पुढीलपैकी कोणत्या प्रकारची भाषा टाळावी ?

(अ) सुसंगत (ब) निःसंदिग्ध

(क) पारदर्शी (ड) आलंकारिक

(7) सारांशलेखन उत्तम रीतीने करता येण्यासाठी खालीलपैकी कोणती गोष्ट आवश्यक नाही ?

(अ) कल्पनाविलास (ब) आकलनक्षमता

(क) वस्तुनिष्ठता (ड) आविष्कार क्षमता

(8) कौटुंबिक सोहळ्याच्या निमंत्रणपत्रिकांची भाषा कशी असावी ?

(अ) जिव्हाळ्याची (ब) आग्रहाची

(क) औपचारिक (ड) कळकळीची



http://www.sgbauonline.com/